नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई यांच्या कार्यालयातील वाहनचालक पदाच्या मे.क्रिष्णा मोटर्स, मुंबई या बाहययंत्रणेकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सेवेबाबत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन आदेश क्र.वाहन-३९२४/प्र.क्र.१३८/ना.पु.१५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२६.

**वाचा :-** १) अ.ना.पु. व ग्रा.स. वि., शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-६६२३/प्र.क्र. ९१/ना.पु.१५, दि.२१.०१.२०२५.
२) अ.ना.पु.व ग्रा.सं.वि., शासन आदेश क्र. वाहन-३९२४/प्र.क्र.१३८/ना.पु.१५, दि.०४.०६.२०२५.
३) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे पत्र क्र. निशि/आस्था/४-अ/प्र.क्र.१२-भाग-२-२०२४/२०२५/जा.क्र. ६८५, दि.२९.०९.२०२५.
४) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे पत्र क्र. निशि/आस्था/४-अ/प्र.क्र.१२-२०२४/२०२५,जा.४६५,५६२ व २६, दि.२६.०६.२०२५, दि.०७.०८.२०२५ व दि.०७.०१.२०२६.
५) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे पत्र क्र. निशि/आस्था/४-अ/प्र.क्र.१२-भाग-२-२०२४/२०२६/जा.क्र. ४३, दि.१२.०१.२०२६.

**<u>प्रस्तावना:-</u>**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयातील पदांचा सुधारीत आकृतीबंध दि.१८.०४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. सदर आकृतीबंधान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, विभागीय जिल्हा पुरवठा कार्यालय व राज्य अन्न आयोगाच्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहनचालक व शिपाई ही संवर्ग मृत घोषित करुन, त्याबाबतच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे घेण्याबाबत मान्यता दिलेली आहे.

२. संदर्भ क्र. १ येथील दि.२१.०१.२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये बाह्यस्रोताव्दारे सेवा घेण्याबाबत निश्चित केलेल्या मनुष्यबळ संख्येच्या मर्यादेत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई व इतर कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहनचालक व शिपाई या पदाच्या सेवा बाह्यस्रोताव्दारे उपलब्ध करुन घेण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

३. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील शासकीय वाहनांवर वाहनचालक संवर्गातील कर्मचाऱ्यांची आवश्यकता लागणार असल्यामुळे सदर कार्यालयाकरीता कंत्राटी तत्वावर ७ वाहनचालकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता मे. क्रिष्णा मोटर्स, जोगेश्वरी या संस्थेसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यास नवीन निविदा अंतिम होईपर्यंत किंवा दि.०१.०७.२०२५ ते दि. ३१.०३.२०२६ या कालावधीकरीता दिलेली मुदतवाढ यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या मुदतवाढीस वेतनापोटी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन आदेश :-</u>**

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवरील शासकीय वाहनांवर वाहनचालक संवर्गातील कर्मचाऱ्यांची यापुढेही आवश्यकता लागणार असल्यामुळे सदर कार्यालयाकरीता ७ वाहनचालकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता मे क्रिष्णा मोटर्स, जोगेश्वरी या संस्थेसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यास नवीन निविदा अंतिम होईपर्यंत किंवा दि.०१.०७.२०२५ ते दि. ३१.०३.२०२६ या कालावधीकरिता मुदतवाढ यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या मुदतवाढीस वेतनापोटी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर सेवापुरवठादार संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या मनुष्यबळाच्या वेतनापोटी प्रति उमेदवार, प्रति माह रु.१९,५००/- (GST सहीत) तसेच अतिकालीक भत्ता (प्रती तास) मुंबईमध्ये रु.४०/-प्रति तास रात्री १० नंतर कामासाठी थांबावे लागल्यास जेवण भत्ता रु.१००/- तसेच मुंबई बाहेरील भत्ता रु.२५०/- (रु.४० प्रति तास नियमानुसार) इतक्या येणाऱ्या खर्चास शासन परिपत्रक वित्त विभाग दि.०२.०२.२०१३, दि.०२.१२.२०१३ व दि.०२.०८.२०१६ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियमित पध्दतीने पदे भरण्यावर खर्चाच्या तुलनेत बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेतांना खर्चात १०% ते २५% बचत होईल या अटीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३) प्रकरणी नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाने उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दिनांक ०१.१२.२०१६ व वित्त विभाग, शासन परिपत्रक, दि.२७.०४.२०२२ व त्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/आदेश/परिपत्रक मधील तरतुदींचा अवलंब केला असेल या अटीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४) सदरचा शासन आदेश हा शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/४/२०१५ मधील, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, उपविभाग-चार-अ.क्र. ११ नियम क्र.११ या नियमांतर्गत सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५) वरील होणारा खर्च सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च मागणी क्र. एम-२ मुख्य लेखाशीर्ष "२४०८- अन्न साठवण व वखार साठवण (०२) शिधावाटप (०२) (०१) मुंबई शिधावाटप क्षेत्र दत्तमत (२४०८ ००६४) १०-कंत्राटी सेवा या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून वित्तीय वर्ष २०२५-२०२६ करिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच त्यापुढील खर्च सदर लेखाशीर्षातील त्या-त्या वर्षी मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६) सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०२२६१७०६२७५८०६ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.02.26 17:07:30 +05'30'

**( पूजा मानकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
२. सर्व उप नियंत्रक शिधावाटप.
३. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
४. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
६. निवडनस्ती-ना.पु.१५